कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग, जिल्हा परिषद नागपूर यांचे कार्यालयामार्फत यथायोग्य क्षेणीत नोदणीकुत खुला प्रवर्ग कंत्राटदार/सु.बे.अ./मजुर सहकारी संस्था/सु.बे.अ.(विदुत) यांचे करीता ऑन लाईन पध्दतीने प्रकाशीत ई-निविदेमधील कामाकरीता अटी व शर्ती (प्रथम वेळ)

| निविदेतील सर्वसाधारन अटी व शर्ती | |
|---|---|
| | अटी व शर्तीचा तपशिल |
| अ.क्र. | |
| १ | उपरोक्त कामाच्या निवीदा अर्ज खालील दर्शविलेल्या तारखांना उपलब्ध होतील व स्वीकारण्यात |
| २ | निवीदा ऑनलाईन डाऊनलोड सादर करण्याचा कालावधी दिनांक / /२०२२ वेळ सकाळी १०.०० वा.ते दिनांक / /२०२२ वेळ दुपारी ३.०० वाजेपर्यंत राहील. |
| ३ | तांत्रीक आणि आर्थीक देकार उघडण्याचे ठिकाण दिनांक व वेळ कार्यकारी अभियंता (बांध) जि.प.नागपूर यांचे कार्यालयांत दिनांक / /२०२२ ला रोजी दुपारी ४.०० वा.किंवा सक्षम अधिकारी ठरवतील त्यादीवशी उघडण्यात येतील. |
| ४ | कामाच्या इतर शर्ती व अटी शेडयुल बी इत्यादी www mahatenders.gov.in वेबसाईटवर उपलब्ध आहे. |
| ५ | सर्व पात्र/इच्छुक निवीदाधारकांनी निवीदा पत्रक डाऊनलोड करण्यासाठी व निवीदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई-निवीदा प्रणालीच्या Main Portal "http://mahatenders.gov.in पद व यांच "http://mahatenders.gov.in enrolled करणे आवश्यक आहे. |
| ६ | निवीदाधारकांना वर नमुद केलेल्या संकेत स्थळावर ऑनलाईन पंजीयन करणे आवश्यक राहील. |
| ७ | वरील कामाची इतर शर्ती व अटी शेडयुल बी ई-निवीदा नमुन्यामध्ये ऑनलाईन पाहावयास मिळतील. |

| निविदेतील इतर आवश्यक अटी व शर्ती | |
|---|---|
| कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद नागपूर मार्फत विविध योजने अंतंगत कामासाठी ऑनलाईन बी-१ निविदेमध्ये निविदाधारकांनी (स्वतंत्र पंजीकृत कंत्राटदार/सुशिक्षित बेरोजगार अभियंता/मजुर सहकारी संस्था) खालील प्रमाणे अटी व शर्ती नुसार निविदा सादर करणे आवश्यक आहे. | |
| १ | www.mahatenders.gov.in या लिंकवरुन कार्यालयामार्फत प्रसिध्द करण्यात आलेल्या निविदांची यादी , अटी व शर्ती व इतर आवश्यक माहिती पाहण्यासाठी उपलब्ध होईल. निविदाधारकांनी स्वतःचे ऑन लाईन अकाउंट उघडुन घ्यावे. तसेच आवश्यक ते सर्व मुळ दस्ताऐवज स्कॅन करुन अपलोड करावे. |
| २ | महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्रमांक सीएटी/२०१७/प्र. क्र.०८/इमा-२ दिनांक २७/०९/२०१८ मुद्दा क्रमांक २ अन्वये ई-निविदा प्रसिध्दीचा किमान कालावधी खालील प्रमाणे आहे. |
| | अ) रु ३ लक्ष ते रु. ५०० लक्ष पर्यंतची कामे प्रथम वेळ - १५ दिवस, दुसरी वेळ - १० दिवस, तिसरी वेळ - ७ दिवस |
| | ब) रु ५०० लक्ष ते रु. २५ कोटी पर्यंतची कामे प्रथम वेळ - २५ दिवस, दुसरी वेळ - १५ दिवस, तिसरी वेळ - १० दिवस |
| | क) रु २५ कोटी ते रु. १०० कोटी पर्यंतची कामे प्रथम वेळ - २५ दिवस, दुसरी वेळ - २५ दिवस, तिसरी वेळ - १५ दिवस |
| | ड) रु १०० कोटी व त्यावरील कामे प्रथम वेळ - ७५ ते ९० दिवस, दुसरी वेळ - ४५ दिवस, तिसरी वेळ - ४५ दिवस (तसेच वेळोवेळी शासनादेशाप्रमाणे |
| ३ | निविदा पुर्व बैठक रु.१५०.०० लक्ष पेक्षा जास्त रक्कमेच्या निविदा करिता आयोजित करण्यात येईल. |
| ४ | महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्रमांक सीएटी/२०१७/प्र क ०८/इमा-२ दिनांक २७/०९/२०१८ नूसार कोरी निविदा पुस्तिका रक्कम खालील प्रमाणे आहे. |
| | १) रु. ३,००,००० लाखापर्यंत रु. २०० + वस्तु व सेवा कर |
| | २) रु. ३,००,००० लक्ष ते ५० लाखापर्यंत रु. ५०० + वस्तु व सेवा कर |
| | ३) रु. ५० लक्ष ते २ कोटी पर्यंत रु. १,००० + वस्तु व सेवा कर |
| | ४) रु. २ कोटी ते ५ कोटी पर्यंत रु. २,००० + वस्तु व सेवा कर |
| | ५) रु. ५ कोटी ते १०० कोटी पर्यंत रु. ३,००० + वस्तु व सेवा कर |
| | ६) रु. १०० कोटी ते ५०० कोटी पर्यंत रु. ५,००० + वस्तु व सेवा कर |
| | ७) रु. ५०० कोटी वरील कामांना रु. १०,००० अ वस्तु व सेवा कर |
| ५ | इसारा रक्कम (EMD) खुला प्रवंग कंत्राटदार,सुशिक्षित बेरोजगार अभियंता व मजुर सहकारी संस्था तसेच विदुत प्रवंग कंत्राटदार यांना इसारा रक्कम ऑनलाईन व्दारे संबंधीत कंत्राटदाराच्या बँक खात्यातुन जमा करणे बंधनकारक राहील. जसे खुला प्रवंग कंत्राटदार/सु.बे.अ. यांनी स्वताचे बँक खात्यातून भरना करावा व मजुर सहकारी संस्थेने अध्यक्ष/सचिव यांचे खात्यातून रक्कमेचा भरना करावा व सदर रक्कम विहीत खात्यातूनच जमा करण्यात आलेली आहे या बाबत खात्याचे विवरन निविदा सादर करतांना सोबत जोडावे अन्यथा आपनास निविदा प्रक्रीयेतून बाद करण्यात येईल. |
| | १) रु.१.५० कोटी रकमेपर्यंतची कामे निविदा रक्कमेच्या 1% प्रमाणे |
| | २) रु.१.५० कोटी रकमेवरील कामे निविदा रक्कम ०.५०% किंवा रु. १.५० लक्ष या पैकी जास्त असेल ती रक्कम |
| ६ | सुरक्षा अमानत रक्कम (Security Deposit) खालील प्रमाणे घेण्यात यावी. |

Scanned with OKEN Scanner

| | |
|---|---|
| | अ. रुपये १.५० कोटीपर्यंत सुरक्षा अनामत रक्कम (Security Deposit) निविदा रक्कमेच्या २ % |
| | ब. रुपये १.५० कोटीपेक्षा जास्त रक्कमेवरील कामाकरिता निविदा रक्कमेच्या १ टक्के प्रमाणे |
| ७ | रु.१.०० कोटी पेक्षा जास्त रक्कमेच्या सर्व कामासाठी पोस्ट क्वालिफिकेशन क्राटेरियाची तरतुद निविदा प्रपत्रामध्ये आहे. |
| ८ | रु.१.५० कोटी पर्यंतच्या रक्कमेच्या निविदा करिता कंत्राटदार नोंदणी ग्रामविकास विभागाकडे यथायोग्य श्रेणी बंधनकारक राहील. रु.१.५० कोटी पेक्षा जास्त निविदा करिता कंत्राटदार पंजीकृत असणे आवश्यक नाही. |
| ९ | निविदा सुचना प्रसिध्द झाल्यानंतर प्रथम वेळेस फक्त एकच निविदा प्राप्त झाल्यास तांत्रिक लिफाफा न तपासता दुसऱ्यादा निविदा प्रसिध्द करण्यात येईल. प्रथम वेळेस दोन पात्र निविदा प्राप्त झाल्यास स्पर्धा होणे शक्य असल्याने आर्थीक बोलीचा लिफाफा उघडण्यात येईल. दुस-या वेळेस एकच पात्र निविदा प्राप्त झाल्यास ती स्विकारण्यात येईल. पात्र निविदा जास्त दराची असल्यास मंजुरी करिता सक्षम प्राधिकरण्याकरिता मंजुरी करिता पाठविण्यात येईल किंवा निविदा फेटाळण्याचे अधिकार जिल्हा परिषदेला राहील. |
| १० | अतिरीक्त कामगिरी सुरक्षा ठेव रक्कम (Additional performance security Deposit) अंदाजपत्रकीय दराच्या १० टक्क्यापेक्षा अधिक दराने कमी असलेल्या निविदा करीता अतिरीक्त सुरक्षाठेव रक्कम निविदा धारकांनी निविदा उघडल्यानंतर ०८ कार्यालयिन दिवसाचे आत DD चे स्वरुपात स्विकारण्यात येईल. DD सरकारी /शेडयूल तसेच सार्वजनिक क्षेत्रात कार्यरत बँकेची असावी. अतिरीक्त सुरक्षा ठेव रक्कम भरण्याची ०८ दिवसाची मुदत कोनत्याही कारणास्तव शिथीलक्षम असनार नाही. ठरावीक कालावधीत अतिरीक्त सुरक्षा ठेव रक्कम जमा न केल्यास निविदा धारकाची बयाना रक्कम जप्त करण्यात येईल. तसेच निविदाधारकास निविदा उघडल्याचे दिनांकापासून ०२ वर्षासाठी बांधकाम विभागाच्या निविदा भरण्यासाठी अपात्र घोषित करण्यात येईल. अश्या परीस्थितीत सदर कामाकरीता नविन निविदा न मागविता L-2 निविदाधारक सदर काम L-1 च्या दारपेक्षा जास्त दराने व त्याच अटी व शर्तीनुसार काम करण्यास तयार असेल तरच महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्रमांक सीएटी/२०१७/प्र. क्र.०८/इमा-२ दिनांक २७/०९/२०१८ नूसार L-2 निविदाधारकाची निविदा स्विकुत करण्यात येईल. |
| | १०.१ :- प्राप्त निम्नतम निविदेचा देकार निविदाधिन कामाच्या किंमतीपेक्षा १०% पर्यंत कमी दराचा असेल तर निविदाधीन कामाच्या १% परंतु कमीतकमी रुपये १०००/- (उदा. ०.०% ते १० % कमी दर १%) |
| | १०.२ :- प्राप्त निम्नतम निविदेचा देकार निविदाधिन कामाच्या किंमतीपेक्षा १०% पर्यंत जास्त कमी दराने असेल तर देकार १% पेक्षा जेवढाजास्त कमी दराने आहे. तेवढी रक्कम वरील मुद्दा क्रं १०.१ मध्ये नमुद केल्याप्रमाणे परंतु कमीत कमी रुपये १०००/- (उदा १४% पेक्षा जेवढा कमी असल्यास १०% पर्यंत १% व वरील ४% असे एकूण ५%) |
| | १०.३ :- प्राप्त निम्नतम निविदेचा देकार निविदाधिन कामाच्या किंमतीपेक्षा १५% पर्यंत जास्त कमी दराने असल्यास उर्वरीत रक्कमेसाठी मुद्दा क्रं १०.२ प्रमाणे ६% अधिक १५% पेक्षा जेवढा कमी दराने आहे त्याच्या दोन पटीने रक्कम परंतु कमीम कमी रुपये १०००/- (उदा १४% कमी असल्यास - १९% कमी |
| | १०.४:- बँक प्रतिभुती हमी/बँकेचा धनाकर्ष किंवा मुदत ठेव मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी जि.प. नागपूर (C. A. & F.O. Z.P. Nagpur) यांच्या नावे असावा. |
| | १०.५ :- प्रथम न्युतम देकार सादर करणारा L-1 निविदाधारक ज्या दिनांकास बँक प्रतिभूती (Bank Guarantee) हमी सादर केली त्या दिनांकापासून दोष दायित्व कालावधीनंतर (Defect Liability Period) एक महिना इतक्या कालावधीपर्यंत बँक प्रतिभूती हमीची मुदत असावी. |
| | १०.६:- खोटी बँक प्रतिभूती हमी/बँक धनाकर्ष किंवा मूदतठेव सादर करणा-या कंत्राटदाराची बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल व सदर कंत्राटदारावा संदर्भिय शासन निर्णय क्रं १ मुद्दा क्रं ४.१५ नुसार कार्यवाही करण्यात येईल याची कंत्राटदारांनी नोंद घ्यावी. |
| | १०.७ :- काम समाधानकारकपणे पूर्ण झाल्यावर निविदेतील तरतुदीप्रमाणे कंत्राटदाराकडुन प्राप्त अतिरीक्त कामगिरी सुरक्षा ठेव रक्कम विहीत काम पुर्ण झाल्याच्या ०२ वर्षानंतर परत करण्यात येईल. |
| ११ | स्वतंत्र कंत्राटदार (नियमित कंत्राटदार), सुशिक्षीत बेरोजगार अभियंता (स्थापत्य व विदुत), मजुर सहकारी संस्था यांनी लीफाफा क्रं १ मध्ये वैध असलेले नोंदणी प्रमाणपत्र,पॅन कार्ड, जी.एस.टी. नोंदणी प्रमाणपत्र,काम केल्याचे वर्क डन प्रमाणपत्र, टी.डी.एस. बाबत (फॉम क्रमांक १६) दस्ताऐवज इत्यादी आनखी महत्वाचे कागदपत्रे Scan करुन निविदेसोबत अपलोड करावी. |
| १२ | सबंधित कामाच्या निविदेमध्ये कामाच्या अंदाजपत्रकामध्ये व शेडयुल बी मध्ये कामाच्या कींमतीसोबत जी.एस.टी., रॉयल्टी, कामगार विमा, यांची रक्कम अधिक करुन असेल फक्त त्याच कामाकरिता जी.एस.टी., रॉयल्टी, कामगार विमा शासनाकडून देय असलेली रक्कम अदा करण्यात येईल. |
| १३ | महाराष्ट्र शासन ग्राम विकास मंत्रालय मुंबई यांचे शासन निर्णय क्रं.ग्रासयो-२०१९/प्र.क्र११२/बांधकाम-२ दिनांक ३० जुन २०२० मुददा क्रं १ नुसार मजूर सहकारी संस्थाच्या कामाच्या सवलती खालील प्रमाणे वाढ करण्यात करण्यात आलेली आहे. |
| | अ वर्ग उच्चतम प्रात्रता असना-या मजुर सहकारी संस्थांना रु. ३०,००,०००/- |
| | ब वर्ग उच्चतम प्रात्रता असना-या मजुर सहकारी संस्थांना रु. १५,००,०००/- |

Scanned with OKEN Scanner

| | |
|---|---|
| १४ | मजुर सहकारी संस्थेस काम वाटप करतांना विनास्पर्धा वाटप झालेली आणि ई-निविदा पध्दतीने मिळालेली कामे अश्या एकत्रित कामांची संख्या जास्तीत जास्त ०३ असेल. कुठल्याही परिस्थितीत एकावेळी एका मजूर सहकारी संस्थेस ०३ पेक्षा जास्त कामे घेता येनार नाहीत.तसेच कामा भरना करीत असतांना हाती ०३ कामे शिल्लक नाही या बाबत १०० रुपये स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र सादर करणे अनिवार्य राहील अन्यथा आपनास निविदा प्रक्रीयेतून बाद करण्यात येईल याची नोंद घ्यावी. |
| १५ | मजुर सहकारी संस्थेस एका आर्थिक वर्षात विनास्पर्धा वाटप झालेली आणि ई-निविदा पध्दतीने मिळालेली जास्तीत जास्त रु. १००.०० लक्ष किंमतीची कामे घेता येईल. विविदा सादर करतांना मजुर सहकारी संस्थेची ऊलाढाल चालू आर्थिक वर्षात रु. १००.०० लक्ष नसल्याबाबतचे १०० रुपये स्टॅम्प पेपरवर प्रति–ापत्र सादर करणे अनिवार्य राहील अन्यथा आपनास निविदा प्रक्रीयेतून बाद करण्यात येईल याची नोंद घ्यावी. |
| १६ | कंत्राटदारांनी निविदा सादर करीत असतांना सदया परिस्थितीत काम सुरु आहे कींवा नाही याबाबततचे वर्क डण व वर्क इन हॉन्ड बाबत स्व साक्षांकीत लेखी प्रमाणपत्र निविदेसोबत अपलोड करावे सदर प्रमाणपत्र निविदा सादरकरतांना अपलोड न केल्यास तांत्रिक लिफाफा क्र. १ उघडतेवेळी आपनास निविदेमध्ये अपात्र ठरविण्यात येईल. याची निविदा सादर करना-या कंत्राटदारांनी नोंद घ्यावी. |
| १७ | स्पर्धेमधुन वाटप झालेल्या कामाचे करारनामे करण्याकरिता आवश्यक सुरक्षा ठेवीच्या रक्कमाचे मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी, जिल्हा परिषद नागपूर यांचे नावे असलेलो धनाकर्ष (डी.डी.) / निविदा फार्म / स्टॅम्प पेपर ०७ दिवसाचे आत या कार्यालयास सादर करावे लागेल. विहीत मूदतीत आवश्यक दस्ताऐवज सादर न केल्यास वाटप झालेले काम रदद करण्यात येईल. |
| १८ | निविदेत सहभागी सु.बे.अ./सोसायटी/खुला प्रर्वग कंत्राटदार यांना वाटप करण्यात आलेली कामे त्याच कंत्राटदाराला करावी लागेल. इतरामार्फत काम केल्यास / आढळल्यास सबंधित कंत्राटदारास काळया यादीत समाविष्ट करण्याची व इतर नियमानुसार आवश्यक कार्यवाही करण्यात येईल. |
| १९ | ई-निविदा सबंधाने नमुद अटी व शर्ती मध्ये काही बदल झाल्यास ते शुध्दीपत्रकाव्दारे http://mahatenders.gov.in या सांकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. |
| २० | कार्यारंभ आदेश निर्गमित झालेल्या दिवसापासुन ०७ दिवसाचे आत काम सुरु करणे व दिलेल्या कालावधीत पूर्ण करणे बंधनकारक आहे. |
| २१ | ई-निविदेचा तांत्रिक लिफाफा क्रं. १ आर्थिक लिफाफा क्रं. २ उघडण्याच्या वेळी निविदा सादर केलेल्या कंत्राटदारांनी या कार्यालयात उपस्थित रहावे. निविदा उघडतांकना भरना करनारे कंत्राटदार हजर नसल्यास विभागा मार्फत निविदा उघडण्यात येतील याची कंत्राटदारांनी नोंद घ्यावी. |
| २२ | ई-निविदा उघडल्यानंतर उघडण्यात आलेल्या निविदेसंबंधी काही तक्रार असल्यास संबंधीत कंत्राटदारांनी त्याच दिवशी आपले लेखी निविदन या कार्यालयास सादर करावे. विहीत मूदतीत आक्षेप सादर न केल्यास आक्षेप विचारात घेण्यात येणार नाही. याची कंत्राटदारांनी नोंद घ्यावी. |
| २३ | कोणतेही कारन न दर्शविता एक अथवा सर्व निविदा नामंजुर करण्याचा अधिकार खालील स्वाक्षरी करणारे सक्षम प्राधिकारी यांनी राखुन ठेवलेले आहे. |
| २४ | कंत्राटदाराने निविदेसोबत दिलेली माहीती अचुक आहे. असे गुहीत धरुन करारनामा करण्यात येईल. चुकीची माहिती देवुन शासनाची दिशाभुल केली किंवा कंत्राट प्राप्त केले असे आढळुन आल्यास शासकीय नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल व सदर निविदा रदद करण्यात येईल. |
| २५ | महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग यांचे पत्र क्रं. ग्रासयो-२०१९/प्र.क्र.११२(भाग-२)/बांधकाम-२ दिनांक १५ जानेवारी २०२१ नुसार निविदेत भाग घेना-या मजुर सहकारी संस्था यांना रु ३.०० लक्षावरील ई-निविदेच्या कामामध्ये आर्थिक पात्रता दाखला आवश्यक केल्यामूळे निविदेत भरना करत असलेले काम करण्याची आर्थिक देण्याची पात्रता आहे. या बाबतचा जिल्हा मजुर सहकारी संघ अध्यक्ष यांचा दाखला निविदा सादर करतांना अपलोड करावा अन्यथा आपणास तांत्रिक लिफाफा क्रं. १ उघडतेवेळी सदर निविदेमधुन अपात्र ठरविण्यात येईल. याची निविदेत भाग घेना-या मजुर सहकारी संस्था यांनी नोंद घ्यावी. |
| २६ | मा.जिल्हाधिकारी, नागपूर यांचे पत्र क्र.खनि-३/कक्ष-२१/कावि-१३५/२०१७ दिनांक १७.०३.२०१७ अन्वये गौण खनिजाचा वापर करणा-या कंत्राटदारांना Royalty clearance certificate मा.जिल्हाधिकारी, नागपूर यांचे कडुन प्राप्त करणे अनिवार्य आहे. त्याशिवाय कंत्राटदारांना कोणत्याही प्रकारचे शोधन करण्यात येणार नाही. याची सर्व कंत्राटदारांनी नोंद घ्यावी. |
| २७ | महा.शासन,वित्त विभाग,शासन परिपत्रक क्र.जीएसटी-१०१७/प्र.क्र.८१/कराधान-१/दिनांक १९ ऑगष्ट २०१७ अन्वयें, व महा.शासन,वित्त विभाग,शासन परिपत्रक क्र.जीएसटी-१०१७/ प्र.क्र.१५५/कराधान-१/दिनांक ११ सप्टेंबर २०१७ अन्वये,तसेच महा.शासन,सा.बां.विभाग,शासन परिपत्रक क्र.२०१७/प्र.क्र.१२१/भाग-२/इमा-२ दिनांक १९ .०९.२०१७ अन्वयें, दिनांक १.०७.२०१७ पासुन वस्तु व सेवा कर (GST) लागु झाल्याने, शासकीय (GST) नियमानुसार कपात करण्यात येईल. याची सर्व कंत्राटदारांनी नोंद घ्यावी. |
| २८ | निविदेतील डांबरीकरणाचे कामा करीता उपयोगात येणारी यंत्रसामुग्री जसे हॉट मिक्स/डम मिक्स प्लॅन्ट, सन्सर पेव्हर फिनीशर, मेकॅनिक ॲस्फाल्ट स्प्रेअर व्हायबेटरी रोलर (केन्द्र शासनाच्या रस्ते परिवहन व महामार्ग मंत्रालयाने विहित केलेल्या प्रचलित निदेशानुसार ) इ. निविदा धारकाकडे नसल्यास बाबत ज्या धारकाकडे ( हॉट मिक्स/डम मिक्स प्लॅन्ट, सन्सर पेव्हर फिनीशर, मेकॅनिक ॲस्फाल्ट) ६०.०० कि.मी. आत आहे. त्या धारकाकडुन रु.५००/- स्टॅम्प पेपरवर नोटरी करारनामा करणे आवश्यक राहील. |
| २९ | सदर कामाचे ई निविदा भरता वेळी स्थळदर्शक नकाशा उपविभागीय अभियंता यांचे स्वाक्षरीने ई निविदेमध्ये अपलोड करणे बंधनकारक राहील. (उदा. सदर काम भरता वेळी काम वन विभाग अथवा कुठल्याही शासकीय अडथळा निर्माण होऊ नये करिता) |

Scanned with OKEN Scanner

| | |
|---|---|
| ३० | सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१२७/इमारती-२ दिनांक २८ नोव्हेंबर २०१८ नूसार निविदा भरणा करतेवेळी निवीदेत<br>भरणा करीत असलेली माहीती पुर्णपणे खरी असले बाबत ५००/- रुपयाचे स्टँम पेपर वर निविदेत भरना करण्यात आलेली माहीती पुर्णपणे सत्य आहे. सोबत<br>जोडण्यात आलेले दस्ताऐवज हे योग्य व वास्तविक आहेत तसेच कोणत्याही विभागात काळया यादीत सामाविष्ट नाही या बाबतचे अॅफीडेविट सादर करणे<br>अनिवार्य राहील याची कंत्राटदारांनी नोंद घ्यावी. (सदर निविदा भरना करतांना भरना करण्यात आलेली माहीती चूकीची कींवा असत्य आढळल्यास आपन<br>फौजदारी कार्यवाहीस पात्र राहाल याची निविदा भरना करना-या खुला प्रर्वग/सु.बे.अ./सोसायटी यांनी नोंद घ्यावी.) |
| ३१ | कंत्राटदारांनी निवीदा भरना करतांना निवेदेचा दर हा कामाचे शेडुल बी मधील फक्त पार्ट अ (बांधकामाचे बाबी) वरच दराचा भरना करावा. |
| ३२ | भाग घेना-या मजुर सहकारी संस्था यांनी ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्रमांक ग्रासयो-२०१९/प्र.क्र ११२/बांधेकाम-२ दिनांक ३०/०६/२०२० मधील मूददा क्रमांक ०५<br>पतदारी प्रमाणपत्र नूसार काम करण्याची आर्थिक पात्रता आहे या बाबतचा जिल्हा उपनिबंधक सहकार कींवा मजुर सहकारी संघ यांचे मार्फत दाखला सादर करणे अनिवार्य<br>राहील. याची काम भरना-या मजूर सहकारी संस्था यांनी नोंद घ्यावी. निविदा भरना करतांना दाखला सादर न केल्यास आपली निविदा रदद करण्यात येईल याची काम भरना-<br>या मजुर सहकारी संस्थेने नोंद घ्यावी. आर्थिक पात्रतेबाबत प्रमाणपत्राची मुदत हे निर्गमित केल्यापासुन आर्थिक वर्ष पुर्ण होईपर्यत असावी. |
| ३३ | भाग घेना-या मजुर सहकारी संस्था यांनी ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्रमांक ग्रासयो-२०१९/प्र.क्र ११२/बांधेकाम-२ दिनांक ३०/०६/२०२० मधील मूददा<br>क्रमांक ०२ (२.३) नूसार विनास्पर्धा वाटप झालेली आणि ई-निविदा पध्दतीने मिळालेली कामे जास्तीत जास्त ०३ असावी असे नमूद केलेल असून भाग घेना-<br>या मजूर सहकारी संस्थांनी हाती असलेली मागील कामे ज्यांचे कार्यारंभ आदेश प्रदाण करण्यात आलेले आहेत अशी कामे पूर्ण झालेबाबतचे प्रतीज्ञापत्र ई<br>निविदा प्रक्रीयेत सोबत जोडणे अनिवार्य राहील याची नोंद घ्यावी. |
| ३४ | सदर कामाकरीता आमंत्रीत करण्यात आलेल्या निवीदेत वेळोवेळी शासनामार्फत प्रदान केलेल्या सुचना/निर्णय/परीपत्रक यानूसार कार्यवाही करण्यात येईल<br>याची निविदा धारकांनी नोंद घ्यावी |
| ३५ | भाग घेना-या सर्वच निविदा धारकांना खुला प्रर्वगात भरना करीत असलेल्या निविदे करीता ३.०० लक्ष रक्कमेच्या वरील निविदा मध्ये Bid Capaity ची<br>अट समाविष्ट करण्यात आलेली आहे. त्यानूसार निविदाधारकानी सनदी रोखपाल यांचे मागील कमीतकमी ०३ वर्षाचे आर्थिक ऊलाढाल प्रमाण्पत्र निनिदा<br>भरना करतांना सोबत सादर करुन त्या अनुशंगाने स्वतेत्र पानावर स्वसांक्षाकीत Bid Capaity ची परिगणना दयावी या सोबत निविदाधारकानी परिशिष्ठ ब<br>नुसार माहीती निविदेसोबत संकेतस्थळावर Upload करावी. (पररशीष्ठ ब Bid Capaity सूत्र सोबत स्वतंत्र पणे जोडण्यात आलेले आहे.) |
| ३६ | निविदेतील कामांवर प्राप्त निधीचे उपलब्धतेनुसार देयकाचे भुगतान करण्यात येईल. |
| ३७ | निविदा धारकाने उपविभागीय अभियंता यांचा 'कामाचा स्थळ पाहणी अहवाल' व सदरिल काम विहित मुदतीस करण्यास तयार असल्याबाबत हमीपत्र निविदेसोबत<br>जोडावे. |
| ३८ | सार्वजनिक बांधकाम विभाग नागपूर यांचे दरपत्रक २०१५-१६ नुसार पृष्ठ क्र.३ मधील मुद्या क्र.७.३ अन्वये कार्यवाही करणे अपेक्षीत असून कंत्राटदाराने ती<br>कामे पूर्ण करण्यासाठी नियूक्ती करण्यात येणा-या कामगारांचा शासकिय विमा अधिकृत विमा कंपनीकडे काढणे आवश्यक राहील. अन्यथा करारनाम्याचे १<br>टक्के विमा रक्कम चालु देयकातुन कपात करण्यात येईल. तसेच कंत्राटदाराने करारनामा करते वेळी संपुर्ण कामाचा विमा कामावरील कुशल/अकुशल<br>कामगाराचे विमा बंधनकारक आहे. व प्रत्यक्ष बांधकाम सुरु करण्यापुर्वी काढलेले विमा बाबतचे आवश्यक दस्ताऐवज बांधकाम विभागास सादर करावे. संपुर्ण<br>कामाचा विमा किंवा मजुराचा विमा न काढता काम सुरु असतांना होणाऱ्या अपघातामुळे कामावरील कुशल/अकुशल मजुराचे झालेल्या नुकसानीची व<br>कामाची नुकसानीची भरपाई करण्यात संबंधित कंत्राटदाराची जबाबदारी राहील. |
| ३९ | रु १०.०० लक्ष पर्यन्त पर्यन्त कंत्राटदारांना करारनामा करतांना ५००/- रु. चे स्टँम्प पेपरवर करारनामा करुन दयावा लागेल.व १०.०० लक्षाच्या वरील मुल्य<br>असलेल्या कामांना प्रत्येकी रु १.०० लक्ष ला रु १००.०० प्रती लक्ष प्रमाणे स्टँप पेपर दयावे लागेल. |
| ४० | बि-१, निवीदा फार्म पान क्रमांक ३४ वर नमुद करारनामा कलम -५४ ची तरतुद सदर निवीदेकरीता लागु राहणार नाही. याची कंत्राटदारानी नोंद घ्यावी. |
| ४१ | निवीदेत समाविष्ट असना-या विदुतीकरणचे कामा करीता समकक्ष काम ३० टक्के पुर्ण केल्याचा अनूभव असने अनिवार्य राहील याची निविदा सादर करण-<br>या कंत्राटदारांनी नोंद घ्यावी. |
| ४२ | मजुर सहकारी संस्था यांना या कार्यालयाचे पत्र क्र. २०५६ दि. २६.०३.२०२२ अन्वये रु. १००/- चे स्टँम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र निविदेसोबत सादर करावे. |
| ४३ | करारनामा करतेवेळी कंत्राटदाराने निविदेमधील कामाकरीता नमुद अटी व शर्तीचे तपशिलावर सही व शिक्कानिशी सादर करावे. |
| ४४ | महाराष्ट्री शासन ग्राम विकास मंत्रालय मुंबई यांचे शासन निर्णय क्रं.ग्रासयो-२०२३/प्र.क्र. ७०/बांधकाम-२ दिनांक ०५ एप्रील २०२३ मुददा क्रं ४.१ नुसार<br>सुशिक्षित बेराजगार अभियंत्यानी प्रत्येक ई - निविदा प्रक्रीयेमध्ये भाग घेतांना परिशिष्ट - २ नुसार बंधपत्र सादर करणे आवश्यक राहील. |

कार्यकारी अभियंता (बांध)
जिल्हा परिषद,नागपूर

मा.अति.मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,नागपूर

Signature Not Verified
Digitally signed by KALPANA SANJAY IKHAR
Date: 2026.05.19 13:55:50 IST
Location: Maharashtra-MH

Scanned with OKEN Scanner